सि. ए. कॉपी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0297 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/07/2021 19:08 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Date From (दिनांक पासून):** 29/07/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/07/2021

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Time From (वेळेपासून):** 16:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:17 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/07/2021 **Time (वेळ):** 19:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 025 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/07/2021 19:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उपअभियंता यांत्रिकी यांत्रिक,उपविभाग कार्यालय, जिल्हा परीषद, लातूर,लातूर, 413512

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सचिन नामदेव सुरवसे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आर्वी ता जि लातूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आर्वी ता जि लातूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9970546999

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे | | | 1. उपअभियंता यांत्रिकी यांत्रिक,जिल्हा परीषद, ,लातूर,लातूर,लातूर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 29/07/2021मी सचिन नामदेव सुरवसे, वय 31 वर्ष, व्यवसाय शेती उपसरपंच आर्वी रा. आर्वी ता. जि. लातूर मो.नं. 9970546999 समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मौजे ग्रामपंचायत आर्वी, ता.जि. लातूर येथे फेब्रुवारी 2021 पासुन उपसरपंच या पदावर कार्यरत आहे. मी दिनांक 27/07/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे येवुन पोलीस निरीक्षक दराडे साहेब यांची भेट घेवुन त्यांना माझा एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याची सांगितले असता, त्यांनी सदर सापळा कार्यवही करीता दोन पंच उपलब्ध करुन घेवुन माझी व पंचाची तसेच सापळा पथकातील सदस्य यांची ओळख करून देवुन पंचा मार्फत माझे नाव गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वर प्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन हस्तलिखित लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.मी वरील प्रमाणे असुन मौजे ग्रामपंचायत आर्वी येथे फेब्रुवारी 2021 पासुन उपसरपंच या पदावर कार्यरत आहे. मौजे ग्रामपंचायत आर्वी येथे ठराव घेवुन गावामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करणे आवष्यक असल्यामुळे उपलब्ध पाच बोरमध्ये नवीन ईलेक्ट्रीकल पाच मोटार टाकण्याचे काम करणे आष्यक असलयामुळे सरपंच बापु चव्हाण यांनी मला ग्रामसेवक यांचे मदतीने सदरचे काम करून घेण्याबाबत दिनांक 25/06/2021 रोजी पत्र दिलेले होते. त्याप्रमाणे मी माझे वैयक्तीक संबंधाने संबंधीत दुकानदार यांचेकडुन पाच ईलेक्ट्रीक मोटार खरेदी करून संबंधीत बोअरवेल मध्ये सोडुन गावचा पाणिपुरवठा सुरळीत केला आहे. सदर खरेदी केलेल्या मोटारचे बिल मिळवण्यासाठी मी ग्रामपंचायतीच्या मार्फतीने जिल्हा परीशदे अंतर्गत पाणी पुरवठा विभागात एम बी (मोजपुस्तीका) करण्यासाठी बील सादर केलेले आहे. परंतु आजपर्यंत सदरची एम.बी. केली नसल्याने व बील मिळाले नसल्याने मी दि. 26/07/2021 रोजी संबंधीत अधिकारी यांची त्यांचे लातूर येथील कार्यालयात जावून भेट घेवुन माझे प्रलंबीत असलेल्या बीलाच्या व एमबीच्या अनुशंगाने त्यांचेषी चर्चा केली असता त्यांनी मला माझे एकुण प्रलंबीत असलेले 7,40,000/-रू. रकमेस मंजुर करण्याकरीता व एमबी करून देण्याकरीता 50,000/-रूपयाची मागणी केलेली आहे. सदरची लाचेची रक्कम ही देण्याची माझी ईच्छा नसुन मी आज रोजी त्यांची पुन्हा भेट घेणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अथवा इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच या कामाच्या व्यतिरीक्त माझा त्यांचेशी कोणत्याही आर्थीक देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. तसेच सोबत मला सरपंचाने अधिकार दिलेल्या पत्राची प्रत जोडली आहे अशा आशयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार व सोबत दिलेल्या पत्रावर पोलीस निरीक्षक दराडे व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत. पोलीस निरीक्षक दराडे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने संबंधीत अधिकारी यांनी माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक दराडे यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी संबंधीत अधिकारी यांना फोन करून ते कार्यालयात आहेत काय?

याची खात्री केली असता संबंधीत अधिकारी हे कार्यालयात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस कच्छवे यांनी डिजीटल व्हइस रेकर्डर चालू करून माझे गळ्यात अडकावुन मी पंच क्रमांक 1 सय्यद यांच्या सोबत संबंधीत अधिकारी यांच्या कार्यालयाकडे माझे मोटारसायकलवरून रवाना होवुन त्यांचे कार्यालयात गेलो असता, संबंधीत अधिकारी हे कार्यालयात मिळुन न आल्याने मी संबंधीत अधिकारी यांना फोन केला असता ते म्हणाले की, मी जेवायला आलोय, तुम्ही फोन करून कार्यालयात या, असे सांगीतले होते. त्याप्रमाणे आम्ही सर्व सदस्य कार्यालयात थांबुन राहिलो. पुन्हा मी संबंधीत अधिकारी यांना फोन केला असता, त्यांनी मला त्यांचे कार्यालयात येण्यास सांगीतले होते. त्यानंतर मी संबंधीत अधिकारी यांना फोन केला असता, त्यांनी कार्यालयात येण्याचे सांगीतल्याने मला व पंचाना पोलीस निरीक्षक दराडे यांनी संबंधीत अधिकारी यांची भेट झाल्यानंतर साई मंदीर, विशाल नगर येथे येण्याचे सांगुन पोलीस कच्छवे यांच्या मदतीने अंदाजे 16.02 वाजता डिजीटल व्हाईस रेकर्डरचे बटन चालु करून देवुन ते माझे गळ्यात अड़कविल्यानंतर मी पंच क्र. 01 सय्यद यांचेसह माझे मोटार सायकलवरून संबंधीत अधिकारी यांचे कार्यालयात गेलो असता, संबंधीत अधिकारी हे कार्यालयात खुर्चीवर बसलेल्या ईसमाकडे अंगुली निर्देषीत करुन सदर इसम हे संबंधीत अधिकारी असल्याचे पंचांना सांगुन त्यांचे जवळ जावुन त्यांचेशी कामाचे अनुशंगाने चर्चा केली असता, संबंधीत अधिकारी यांनी आणलो.... पैसे आणलो....असे म्हणाले असता मी त्यांना म्हणालो की.. देतो की... झालंय.... अं.... म्हणजे मित्र येउलालता.... सरपंच थोडं कमी करा म्हणालते... पाच मोटर हायत म्हणालते....असता संबंधीत अधिकारी यांनी मला जास्त घेताव मी.... पण... असे म्हणाले असता मी संबंधीत अधिकारी यांना म्हणालो... पन्नास जास्त होवुलालेत... पन्नास हजार......त्यावर संबंधीत अधिकारी म्हणाले... होय नाहीत.... साडे सात लाखाची.... ह्यच्यात अजुन तुम्हाला अडजेस्ट करून देईन.... ह्यच्यापेक्षा कमी नाही.....काल उलट मी साठ-पासट म्हणणार होतो.... हीच सगळ जुळता जुळणा....असे संबंधीत अधिकारी मला म्हणाले असता मी संबंधीत अधिकारी यांना म्हणालो... नाही... दहा एक हजार कमी केलो असतो तर....असे म्हणालो असता संबंधीत अधिकारी यांनी मला म्हणाले.... नाही.... नाही.... करूत पुढच्या वेळेस.... पुढचं बील हायच अजुन..... व्यवस्थीत करून देतो काही अडचण नाही.... आज जरी तुम्हाला दहा जास्त वाटत असले... दहा चे पंधरा-वीस काढुन देईन तुम्हाला.... त्याचा विशय नाही....खरच फायदा हाय.... शंभर टक्के फायदा हाय.... तुम्ही त्यचा विचारच करू नका.... माझा शब्दावर भरोसा ठेवुन चला.... खरचं ऐका तुम्ही... तुम्हाला भविष्यात लक्षात येईल की.... बाबा दुस-या जेई कडे तुम्ही जातचं असणारच हायत.... तिथले अनुभव बघा माझही... बघा वाटल तर... एक रूपयाही देवु नका.....असे संबंधीत अधिकारी मला म्हणाले असता मी संबंधीत अधिकारी यांना म्हणालो मग आता घेवुन येवु का पैसे.....असे म्हणालो असता संबंधीत अधिकारी मला म्हणाले की... चालतयं....असे म्हणुन पैसे घेवुन येण्याचे सांगीतले व त्यासोबत चुकलेली कागदपत्रे दिलेली आहेत. ती घेवुन मी व पंच साई मंदीर, विशालनगर येथे परत आलो असता पोलीस कच्छवे यांनी माझेकडील व्हईस रेकर्डर बंद करून माझेकडे व पंचाकडे विचारणा केली असता मी व पंचानी वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. आम्ही सर्वानी पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्यात व अधिकारी यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन संबंधीत अधिकारी यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 60,000 /-रू. ते 65,000/-रू. लाचेची मागणी करून तडजोडी अंती 40,000/-रुपये तक्रारदार यांच्याकडुन लाच मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे निश्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक दराडे यांनी संबंधीत अधिकारी यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 80 चलनी नोटा असे एकुण 40,000/-रुपये समक्ष हजर केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक षासकीय वाहनामध्ये करुन दाखवुन मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक नमुद करून सदर नोटांना पोलीस जाधव यांच्या मदतीने अन्थ्रासीन पावडर लावली. लाचेची रक्कम दिल्यानंतर संधी साधुन गळ्यात असलेला गमजा काढुन हातात घेवुन सापळा पथकाच्या निदर्षनास पडेल अशा पध्दतीने लाच स्वीकृतीचा नियोजीत इषारा करुन परत संबंधीत अधिकारी यांना बोलत थांबावे, असे सांगुन अन्थ्रासीन पावडरयुक्त रक्कम 40,000/-रू. ही लाचेची रक्कम पोलीस जाधव यांचे मदतीने माझे शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशात ठेवुन पोलीस कच्छवे यांनी अंदाजे 16.54 वाजता डिजीटल व्हईस रेकर्ड चालु करुन माझे गळ्यात अडकावुन मी व पंच क्रमांक 1 सय्यद यांना संबंधीत अधिकारी यांची भेट घेण्यासाठी मी पंचासह त्यांचे कार्यालयात जात असतांना पथकातील इतर सदस्य आमच्या पाठीमागे होते. सदर ठिकाणी संबंधीत अधिकारी हे नसल्याने मी संबंधीत अधिकारी यांना फोन केला असता, त्यांचा फोन लागला नाही म्हणुन पुन्हा मी व पंच ला.प्र.वि. कार्यालयात जावुन पोलीस निरीक्षक श्री दराडे साहेब यांना झाली हकीकत सांगीतली. त्यानंतर मी पुन्हा संबंधीत अधिकारी यांना पुन्हा फोन लावला असता फोन लागला नाही. परंतु मी पोलीसांना सांगीतले की, संबंधीत अधिकारी हे मला फोन करतील व त्यांचा फोन आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे ठरवुन सदर दिवसाची कार्यवाही स्थगित करण्यात आलेली होती.सदरची पुढील कार्यवाही आज दिनांक 29/07/2021 रोजी करण्याकरीता आम्ही ला.प्र.वि. कार्यालय, लातुर येथे हजर असतांना सर्वानुमते संबंधीत अधिकारी यांना फोन करण्याचे ठरवुन मी माझ्या मोबाईलवरुन फोन केला असता संबंधीत अधिकारी यांना फोन लागला नाही. त्यामुळे उर्वरीत पुढील कार्यवाहीच्या अनुशंगाने माझेकडे विचारणा केली असता माझे असे म्हणणे आहे की, संबंधीत अधिकारी यांना सदर घटनेबाबत संषय आला असावा म्हणुन ते माझा फोन उचलत नाहीत किंवा यापुढेही उचलणार नाहीत. तसेच लाच स्वीकारण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसुन येत असुन सापळा कार्यवाही पडताळणी दरम्यान माझे कामासाठी लाच मागणी केलेली रक्कम 40,000/-रू. हे संबंधीत अधिकारी हे माझेकडुन यापुढेही स्वीकारणार नाही, असे माझी खात्री झाल्याने सदरची कार्यवाही स्थगित करून लाच मागणीच्या अनुशंगाने त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी. असा सविस्तर जबाब दिलेला आहे.तरी यातील लोकसेवक ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे, वय 54 वर्ष, वर्ग-3, पद-षाखा अभियंता, नेमणुक उपअभियंता (यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परीषद, लातूर रा. बार्षी रोड, अष्थमेघ हटेलच्या पाठीमागे, ता. जि. लातूर यांनी दिनांक 27/07/2021 रोजी 16.17 वाजता संबंधीत अधिकारी यांचे कार्यालयात जिल्हा परीशद अंतर्गत पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात आलेल्या मौजे आर्वी ग्रामपंचायत मार्फतीने मी मौजे ग्रामपंचायत आर्वी मध्ये यापुर्वी उपलब्ध असलेल्या जुन्या बोअरवेलमधील नविन पाच इलेक्ट्रीक मोटारीचे बिलाचे एम.बी. (मोजपुस्तीका) करण्यासाठी व प्रलंबीत असलेले 7,40,000/-रू. बिल मंजुर करण्याकरीता माझ्याकडे 60,000/-रू. ते 65,000/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 40,000/-रुपये लाच मिळवण्याचा प्रयत्न केला आहे व त्यांना संषय आल्याने सदर लाचेची रक्कम घेण्याचे जाणुन बुजून टाळले आहे म्हणुन माझी लोकसेवक ज्ञानदेव प्रल्हादराव सुडे, पद-शाखा अभियंता, नेमणुक उपअभियंता (यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परीषद, लातूर यांच्या विरुध्द कायदेषिर तक्रार आहे.मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रारी ही पोशि कच्छवे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे संगणकावर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Sunil Bansilal Pujari(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची
**Name** (नाव): Sunil Bansilal Pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

ASI J. M. Gaikwad